# यावल महाविद्यालयात आंतर महाविद्यालयीन क्रॉस कंट्री स्पर्धा उत्साहात

यावल (प्रतिनिधी )जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक सहकारी समाज मर्यादित जळगाव संचालित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ अंतर्गत जळगाव विभाग आंतर महाविद्यालयीन क्रॉस कंट्री स्पर्धेचे दिनांक 2 जानेवारी रोजी आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रा. चंद्रकांत डोंगरे सचिव जळगाव विभाग क्रीडा समिती हे उद्धाटक होते तर अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ . संध्या सोनवणे यांनी भूषविले.

मैदानाची विधीवत पूजा करून प्रा. डोंगरे यांच्या शुभहस्ते स्पर्धेचे उद्धाटन करण्यात आले. यावेळी निवड समिती सदस्य डा ॅ. पी. आर .चौधरी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून स्पधेंची नियमावली सांगितली .अध्यक्ष डॉ. संध्या सोनवणे यांनी प्रतिपादन केले की शारीरिक विकास करण्यासाठी खेळ गरजेचा आहे .स्पर्धेत भाग घेऊन त्यात प्राविण्य मिळवता येते त्यातून करिअर घडवता येते .

सदर स्पर्धेत प्र . प्राचार्य किशोर पाठक यांनी हिरवा झेंडा दाखवून स्पर्धा सुरू केल्या .या स्पर्धेत मुलींमध्ये प्रथम सहा व मुलांमध्ये प्रथम सहा स्पर्धकांची विभागीय क्रॉसकंट्री स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. या स्पर्धेत तेरा महाविद्यालयातील संघ सहभागी झाले होते.यात एकूण 16 मुली व39 मुले स्पर्धकांनी स्पर्धेत भाग घेतला. संघ प्रमुख म्हणून डॉ. वीरेंद्र जाधव, डॉ. महेश पाटील ,डॉ. अमोल पाटील, प्रा. राजेंद्र भालोदकर ,श्री विनायक पाटील, श्री वसंत सोनवणे ,प्रा. सुभाष वानखेडे ,प्रा उमेश पाटील व डॉ. मारतळे उपस्थित होते .

क्रीडा स्पर्धेचे आयोजन क्रीडा समिती प्रमुख डॉ.पी.०ही .पावरा व उपप्राचार्य प्रा . ए. पी .पाटील यांनी केले .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डाॅ. सुधा खराटे यांनी केले तर आभार प्रा. एम .डी  खैरनार यांनी मानले. स्पर्धा यशस्वितेसाठी डॉ.एस.पी कापडे , प्रा. संजय पाटील, प्रा . एस .आर. गायकवाड ,डाॅ एच जी. भंगाळे ,डॉ आर.डी. पवार,प्रा.मुकेश येवले, प्रा. मनोज पाटील, मिलिंद बोरघडे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.









तरुण भारत

# यावल महाविद्यालयात आंतर महाविद्यालयीन क्रॉस कंट्री स्पर्धा उत्साहात



**यावल :** जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक सहकारी समाज मर्यादित जळगाव संचालित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ अंतर्गत जळगाव विभाग आंतर महाविद्यालयीन क्रॉस कंट्री स्पर्धेचे २ जानेवारी रोजी आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रा. चंद्रकांत डोंगरे सचिव जळगाव विभाग क्रीडा समिती हे उद्घाटक होते तर अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ.संध्या सोनवणे यांनी भूषविले.

मैदानाची विधीवत पूजा करून प्रा. डोंगरे यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी निवड समिती सदस्य डॉ.पी.आर.चौधरी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून स्पर्धेची नियमावली सांगितली. अध्यक्ष डॉ. संध्या सोनवणे यांनी प्रतिपादन केले की, शारीरिक विकास करण्यासाठी खेळ गरजेचा आहे .स्पर्धेत भाग घेऊन त्यात प्राविण्य मिळवता येते त्यातून करिअर घडवता येते .

सदर स्पर्धेत प्र.प्राचार्य किशोर पाठक यांनी हिरवा झेंडा दाखवून स्पर्धा सुरू केल्या. या स्पर्धेत मुलींमध्ये प्रथम सहा व मुलांमध्ये प्रथम सहा स्पर्धकांची विभागीय क्रॉसकंट्री स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. या स्पर्धेत तेरा महाविद्यालयातील संघ सहभागी झाले होते. यात एकूण १६ मुली व ३९ मुले स्पर्धकांनी स्पर्धेत भाग घेतला. संघ प्रमुख म्हणून डॉ.वीरेंद्र जाधव, डॉ.महेश पाटील, डॉ.अमोल पाटील, प्रा.राजेंद्र भालोदकर, विनायक पाटील, वसंत सोनवणे, प्रा.सुभाष वानखेडे, प्रा. उमेश पाटील व डॉ. मारतळे उपस्थित होते .

क्रीडा स्पर्धेचे आयोजन क्रीडा समिती प्रमुख डॉ.पी.व्ही. पावरा व उपप्राचार्य प्रा.ए.पी.पाटील यांनी केले. सूत्रसंचालन डॉ.सुधा खराटे यांनी केले. आभार प्रा.एम.डी. खैरनार यांनी मानले. स्पर्धा यशस्वितेसाठी डॉ.एस.पी. कापडे, प्रा.संजय पाटील, प्रा.एस.आर. गायकवाड, डॉ.एच.जी. भंगाळे, डॉ.आर.डी. पवार, प्रा.मुकेश येवले, प्रा.मनोज पाटील, मिलिंद बोरघडे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

दैनिक दिव्य मराठी
04-Jan-2022
भुसावळ Page 2

क्रीडा जगत • यावल महाविद्यालयात आंतर महाविद्यालयीन क्रॉसकंट्री स्पर्धांचे झाले आयोजन

# खेळांकडे करिअर म्हणून बघावे : डॉ.सोनवणे

प्रतिनिधी । यावल



यावल महाविद्यालयात आंतर महाविद्यालयीन क्रॉस कंट्री स्पर्धेत १३ महाविद्यालयाचे संघ सहभागी झाले.

शैक्षणिक जीवनात पुस्तकी ज्ञानाने बुद्धीमत्तेचा विकास होतो. त्याचप्रमाणे मैदानी खेळांमुळे शारिरीक विकास होतो. मैदानी खेळ हे केवळ मनोरंजनासाठी नसतात. त्यात करिअरच्या अनेक संधी उपलब्ध आहेत, असे प्रतिपादन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. संध्या सोनवणे यांनी केले. यावल महाविद्यालयात आयोजित आंतर महाविद्यालयीन क्रॉसकंट्री स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या. या स्पर्धेत १३ महाविद्यालयांचे संघ सहभागी झाले होते.

जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक सहकारी समाज मर्यादित जळगाव संचालित, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात क्रॉस कंट्री स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ अंतर्गत ही स्पर्धा झाली. उद्घाटन जळगाव विभाग क्रीडा समितीचे सचिव प्रा. चंद्रकांत डोंगरे यांच्याहस्ते झाले. अध्यक्षीय भाषणात डॉ. संध्या सोनवणे यांनी शारीरिक विकास करण्यासाठी खेळ गरजेचे आहेत. स्पर्धेत भाग घेऊन त्यात प्राविण्य मिळवता येते, त्यातून करिअर घडवता येते. तेव्हा विद्यार्थ्यांनी करीअर म्हणुन देखील खेळांकडे बघितले पाहिजे असे सांगितले. या स्पर्धेत प्राचार्य किशोर पाठक यांनी हिरवा झेंडा दाखवून स्पर्धेला प्रारंभ केला. स्पर्धेत १६ महाविद्यालयांमधून एकूण १६ विद्यार्थिनी व ३९ विद्यार्थी स्पर्धकांनी भाग घेतला होता. निवड समिती सदस्य डॉ.पी.आर.चौधरी, संघ प्रमुख डॉ. वीरेंद्र जाधव, डॉ. महेश पाटील, डॉ. अमोल पाटील, प्रा. राजेंद्र भालोदकर उपस्थित होते.

## १२ खेळाडूंची विभागीय स्पर्धेत निवड

महाविद्यालयात कबड्डी, व्हॉलिबॉल व धावण्याच्या शर्यतीत यश संपादन केलेल्या ६ विद्यार्थिनी व ६ स्पर्धकांची विभागीय स्पर्धेत निवड केली.